पुण्य नगरी
पुणे, शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६

# भरतनाट्यमच्या माध्यमातून पुणेकरांनी अनुभवली पांडुरंगाची उपासना



**पुणे : प्रतिनिधी**

चेहऱ्यावरील सूक्ष्म हावभाव, हातांच्या विशिष्ट मुद्रा, लय-तालातील पायांच्या गुंतागुंतीच्या हालचाली आणि शास्त्रीय संगीताच्या साथीने सादर झालेल्या भरतनाट्यममधून पांडुरंगाच्या भक्तीने पुणेकर अक्षरशः न्हाऊन निघाले. निमित्त होते फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे आयोजित 'माऊली - एक कालातीत परंपरा' या भक्ती, परंपरा, कला व ईश्वर यांच्यातील संबंधाच्या उत्सवाचे.

पंढरपूर वारीचा आत्मा जिवंत करणारी ही कला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम नृत्यांगना, नृत्यदिग्दर्शिका आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या विशेष सादरीकरणातून अनुभवायला मिळाली. कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांनी आपल्या नृत्यातून पांडुरंग आणि भक्त यांच्यातील भावबंध उभा केला. डोळे व चेहऱ्यावरील हावभावांइतकेच हातांच्या मुद्रांमधून त्यांनी भक्तीची गहिराई व्यक्त केली. या नृत्याच्या माध्यमातून संपूर्ण विश्व एकरूप असल्याची अनुभूती प्रेक्षकांना झाली.

संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत एकनाथ महाराज यांच्या विविध अभंग, ओव्या आणि भारुडांवर आधारित नृत्य सादर करण्यात आले. 'उदंड पाहिले उदंड ऐकिले', 'सुंदर ते ध्यान', 'रूप पाहता लोचनी', 'खेळ मांडियला वाळवंटी घाई', 'कशी जाऊ मी वृंदावन' आणि 'मुरली वाजविती कान्हा' यांसारख्या रचनांचा यात समावेश होता.